पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक २०.०५.२०१९

# वार्तापत्र

आज रोजी सकाळी ०७.०० ते ०७.३० वा.च्या सुमारास गडचिरोली पोलीस दलातील सी-६० चे जवान नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना उप विभाग भामरागड अंतर्गत येणा-या पोलीस मदत कोठी हद्दीतील मौजा कोपर्शी येथील जंगल परिसरात दबा धरुन बसलेल्या नक्षलवादयांनी सी-६० जवानांना जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांचेवर गोळीबार केला त्यामुळे सी-६० जवानांनी स्वसंरक्षणार्थ व प्रतिउत्तरादाखल गोळीबार केला. तेव्हा पोलीसांचा वाढता दबाव पाहुन नक्षलवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

सदर घटनेनंतर परिसराची पाहणी केली असता मोठया प्रमाणावर नक्षल साहीत्य मिळुन आले. नक्षल विरोधी अभियान तिव्र करण्यात आलेले आहे.